# गोंदिया जिल्हा पक्षी वैभव

**प्रकाशक : जिल्हा माहिती कार्यालय गोंदिया / पृष्ठ संख्या २१०**

सारसाची सुरस कहाणी या माहिती पुस्तकाच्या उत्तुंग यशानंतर गोंदिया जिल्हा माहिती कार्यालयाने फेब्रुवारी २०२३ मध्ये आणखी एक नवं पुस्तक प्रकाशित केले आहे. याची रूपरेषा जिल्ह्यात आढळणाऱ्या पक्ष्यांबाबत माहिती पुरविण्याच्या उद्देशाने बनवली आहे. पक्षी राजधानी असे नावलौकिक मिळवलेल्या गोंदिया जिल्ह्यात पर्यटकांना पक्ष्यांची विविधता कळवण्यासाठी या कॉफीटेबल पुस्तकाची निर्मिती झाली. जिल्हा माहिती अधिकारी रवी गीते आणि अपर जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी महाराष्ट्रातील अनेक पक्षी अभ्यासकांच्या सहकार्याने यामधील माहितीचे संकलीत करून अगदी सुरेख पद्धतीत वाचकांच्या पुढ्यात ठेवली आहे. पक्ष्यांच्या दुर्मिळ, सुंदर आणि विलोभनीय छायाचित्रांनी पुस्तक सजले आहे. त्यासोबत पुरवलेली माहिती बारा मुख्य घटकांपासून बनली आहे. ज्यामध्ये प्रजातीचे मराठी नाव, इंग्रजी नाव, शास्त्रीय नाव, पक्ष्याची लांबी, आकार, ओळख, अधिवास, खाद्य, आवाज, घरटे, विणीचा हंगाम आणि अंड्याची संख्या मांडली आहे. राहुल ब्राह्मणकर आणि संदीप पंचे यांच्या सहाय्याने गोंदिया जिल्ह्यात आढळणाऱ्या पक्षी प्रजातींची यादी पुस्तकाच्या अखेरीस परिशिष्टत केली आहे. या यादीत ३२५ प्रजाती नोंदिवली असून १९४ प्रजातीची सचित्र माहिती पुस्तकात आली आहे. त्याच बरोबर २५ नामशेष होऊ लागलेल्या प्रजातींची स्वतंत्र यादी दिली असून आठ प्रजातींची माहिती संकलित केली आहे.




पर्यावरणाच्या पंखात बळ देणारा उपग्रह अशा शब्दात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी गोंदिया जिल्हा पक्षी वैभव या पुस्तकाचे कौतुक केले. राज्याचे वनमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी प्रशासनाचे अभिनंदन करत हा प्रकल्प अनुकरणीय असल्याचे व्यक्त केले.

पुस्तकाच्या निर्मितीकारांनी सूचनांच स्वागत केले आहे. पुढील आवृत्तीमध्ये त्यांचा विचारही केला जाऊ शकेल. त्या अनुषंगाने सर्व नामशेष होऊ लागलेल्या प्रजातींची माहिती दिल्यास दुर्मिळ प्रजाती विषयी वाचकांपर्यंत सहजतेने पोहोचू शकेल. यासारखे स्तुत्य उपक्रम इतर जिल्ह्यात व इतर सजीव समूहाबद्दलही झाल्यास पर्यावरण व वन्य जीवनाची जनजागृतीमध्ये एक सकस प्रयत्न होईल.

◆

**राहुल श्रीकृष्ण वंजारी, सोलापूर**
मो. ९९६०३४७४५४